admn 18-19


# महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन परिषद,

(महाराष्ट्र कृषी विद्यापीठ अधिनियम, १९८३ मधील कलम १२ नुसार स्थापित)

आयएस्ओ ९००१ : २००८ मानांकित संस्था

१३२/ब, भांबुर्डा, भोसलेनगर, पुणे - ४११ ००७.

MCAER
कृषि परिषद

ई-मेल : edn_mcaer@rediffmail.com

संकेतस्थळ : www.mcaer.org

दूरध्वनी (०२०) २५५३ ७६८८.

फॅक्स (०२०) २५५३ ३७६४.


जा.क्र. मकृप/शिक्षण-१/२६१८/9622

दि. ११ जुलै,२०१८

## प रि प त्र क

**विषयः- कृषी तंत्रनिकेतन पदविकाधारकांना कृषी पदवीच्या थेट दुसऱ्या वर्षात प्रवेश प्रक्रिया अंतर्गत द्यावयाच्या क्रीडाविषयक अधिभाराबाबत.**

कृषी तंत्रनिकेतन पदविकाधारक उमेदवारांना कृषी पदवी अभ्यासक्रमाच्या थेट दुसऱ्या वर्षात प्रवेश देण्याची सन २०१८-१९ हया शैक्षणिक वर्षातील प्रवेश प्रक्रिया चालू आहे. याअंतर्गत क्रीडाविषयक अधिभार प्राप्त करण्यासाठी जिल्हा क्रीडा अधिकाऱ्याचे प्रमाणपत्र अनिवार्य आहे. मात्र कृषी तंत्रनिकेतन पदविका अभ्यासक्रमामध्ये शिक्षण घेत असतांना, विद्यार्थी कल्याण अधिकाऱ्याकडून क्रीडाविषयक प्रमाणपत्रे देण्यात येतात. अशा कृषी तंत्रनिकेतन पदविकाधारकांना पदवी अभ्यासक्रमामध्ये प्रवेश घेतेवेळी जिल्हा क्रीडा अधिकाऱ्याचे प्रमाणपत्र सादर करता येत नाही.

वरील बाब विचारात घेऊन कृषी तंत्रनिकेतन पदविकाधारकांकरिता, जिल्हा क्रीडा अधिकाऱ्याचे प्रमाणपत्राऐवजी विद्यार्थी कल्याण अधिकाऱ्याचे प्रमाणपत्र या परिपत्रकाद्वारे ग्राह्य धरण्यात येत आहे.

याबाबत सर्व संबंधितांनी नोंद घ्यावी.

(रविंद्र जगताप) भा प्र से
महासंचालक

प्रति,

१. मे. कल्प टेक्नॉलॉजीज प्रा.लि., तिसरा मजला, गोपाळ हाऊस, हॉटेल किमयाजवळ, कर्वे रोड, कोथरुड, पुणे ४११ ०२९.

यांना सूचित करण्यात येते की, त्यांनी सदर परिपत्रक संकेतस्थळावर उपलब्ध करावे तसेच परिपत्रकामध्ये नमूद केल्यानुसार क्रीडाविषयक अधिभार ग्राह्य धरावा.

२. मे. जे. डी. आय. एन. सॉफ्ट, आरएच-७, प्लॉट क्र. ६१, सेक्टर क्र. १६, पीसीएनटीडीए, चिखली, पुणे ४११ ०१९.

यांना सूचित करण्यात येते की, उक्त परिपत्रक कृषी परिषदेच्या संकेतस्थळावर उपलब्ध करून द्यावे.

प्रतः- कुलसचिव / अधिष्ठाता (कृषी), महात्मा फुले कृषी विद्यापीठ,राहुरी, जि.अहमदनगर /डॉ.पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोला / वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ, परभणी / डॉ.बाळासाहेब सावंत कोंकण कृषी विद्यापीठ, दापोली जि.रत्नागिरी